# DECLARATION

*I hereby declare that this disseration entitled, "SHREE MOUNI VIDYAPEETH, GARGOTI : A ADMINISTRATIVE STUDY" has been written by me and submitted to the Shivaji University, Kolhapur for the Degree of Master of Philosophy in Political Science.*

*Kolhapur,*

*Date :* 31/01/2009

**RUPALI A. MURGUDE**

*Research Student*

# ऋणनिर्देश

आजच्या काळात समाजाच्या सर्वांगिण विकासामध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण संस्था व विद्यापीठे ही ज्ञानार्जन करणाऱ्या संस्था म्हणून कार्यरत आहेत. त्या अनुषंगानेच मी समाजातील सर्व घटकांना विविध क्षेत्रात उपयोगी पडणारी उपयुक्त अशी माहिती पुरवून निर्मितीक्षम स्वावलंबी नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे जडणघडण करणारे श्री मौनी विद्यापीठ या महत्त्वपूर्ण शिक्षण संस्थेवर शोधप्रबंध लिहिण्याचा निर्णय घेतला त्यामुळे 'श्री मौनी विद्यापीठ गारगोटी: एक प्रशासकीय अभ्यास ' हा विषय संशोधनासाठी निवडला. या विषयाला माझे मार्गदर्शक डॉ. दादासाहेब रा. शिरगावे सर यांनी सहमती दर्शविली. त्यांचे सहकार्य, प्रेरणा व मार्गदर्शन यामुळेच हा शोधप्रबंध मी पूर्ण करु शकले. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

कोणतेही कार्य मार्गदर्शनाशिवाय पूर्ण होत नाही. शोधप्रबंध लिहिताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर, डॉ. सौ. व्ही. पी. रासम मॅडम, प्रा. सौ. भारती पाटील मॅडम, डॉ. के. के. कावळेकर सर, डॉ. मेधा नानीवडेकर मॅडम, डॉ. लक्ष्मीनारायण तारोडी सर, प्रा. भोये सर या गुरुवर्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांचे मी अंत:करणपूर्वक आभार मानते.

श्री मौनी विद्यापीठाचे विद्यमान अध्यक्ष मा.आमदार सतेज उर्फ बंटी डी. पाटील, मॅनेजींग कमिटीचे चेअरमन मा. आशिष कोरगांवकर तसेच मौनी विद्यापीठाचे विद्यमान संचालक मा. चंद्रकांत डी. चौगुले यांचे आभार मानते. प्रबंधपूर्तीच्या कामी मौनी विद्यापीठातील श्री. चांदके सर, श्री. कारखानीस सर, श्री. सातवेकर सर, श्री. नारायण देसाई सर तसेच विद्यापीठाचे विश्वस्त, व्यवस्थापन समिती, संचालक सचिव, सल्लागार समिती, कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व वेळोवेळी सहकार्य केले याबद्दल त्यांचे आभार मानते.

मला शिक्षणासाठी सतत प्रेरणा देणारे माझे आई-वडील व सर्व सहकुटुंबीय यांचे आशिर्वाद हे माझे सामर्थ्य आहे. मला शोधप्रबंध लिहिताना माहिती मिळविण्यासाठी सतत सहकार्य देणारे सर्व मित्र, मैत्रिणी, राज्यशास्त्र विभागातील श्री अभिजीत पाटील, श्री.ठोमके तसेच श्री संभाजी तोरस्कर, श्री. अरुण दणिरे यांचे मन:पूर्वक आभार मानते.

या विषयाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणाऱ्या कार्यात श्री मौनी विद्यापीठाचे कार्यालय, दैनिक सकाळ, दै. पुढारी, दै. तरुण भारत व शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय संघ, कोल्हापूर यांची मोलाची मदत मिळाली. या शोधप्रबंधाचे काम तत्परतेने पूर्ण करुन देणारे श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर तसेच या कामी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य, प्रोत्साहन लाभले त्या सर्वांचे आभार मानते.

धन्यवाद !

**रुपाली आ. मुरगूडे**